22130599

International Baccalaureate®
Baccalauréat International
Bachillerato Internacional

**MARATHI A: LITERATURE – STANDARD LEVEL – PAPER 1**
**MARATHE A : LITTÉRATURE – NIVEAU MOYEN – ÉPREUVE 1**
**MARATHI A: LITERATURA – NIVEL MEDIO – PRUEBA 1**

Wednesday 8 May 2013 (morning)
Mercredi 8 mai 2013 (matin)
Miércoles 8 de mayo de 2013 (mañana)

1 hour 30 minutes / 1 heure 30 minutes / 1 hora 30 minutos

INSTRUCTIONS TO CANDIDATES

- Do not open this examination paper until instructed to do so.
- Write a guided literary analysis on one passage only. In your answer you must address both of the guiding questions provided.
- The maximum mark for this examination paper is *[20 marks]*.

INSTRUCTIONS DESTINÉES AUX CANDIDATS

- N’ouvrez pas cette épreuve avant d’y être autorisé(e).
- Rédigez une analyse littéraire dirigée d’un seul des passages. Les deux questions d’orientation fournies doivent être traitées dans votre réponse.
- Le nombre maximum de points pour cette épreuve d’examen est *[20 points]*.

INSTRUCCIONES PARA LOS ALUMNOS

- No abra esta prueba hasta que se lo autoricen.
- Escriba un análisis literario guiado sobre un solo pasaje. Debe abordar las dos preguntas de orientación en su respuesta.
- La puntuación máxima para esta prueba de examen es *[20 puntos]*.




© International Baccalaureate Organization 2013

*कोणत्याही **एका** उता-याचे मार्गदर्शक प्रश्नांच्या आधारे वाङ्मयीन विश्लेषण लिहा. उत्तर लिहिताना दोन्ही मार्गदर्शक प्रश्न लक्षात घेणे आवश्यक आहे.*

**1.**

पोरगी गेली तरी कुठं? तिन्ही बुरूज पाहून झाले. पडझड फार झाली होती. आता हे बुरूज फार काळ टिकणार नाहीत. पाहता पाहता - कदाचित आपल्या डोळ्यांसमोरसुद्धा जमीनदोस्त होऊन जातील... ती अधिकच विषण्ण झाली. विषण्णपणेच राधेला शोधत राहिली. पोरगी गढीच्याबाहेर तर जाणार नाही. मग गेली तरी कुठं बरं ही?

विचार करीत करीत सुनंदा वाड्याच्या चौकात येऊन थांबली तर हसण्याचा आवाज झाला खालून पायाजवळून. म्हणजे ही तळघरात गेलीय तर! सुनंदा हळूहळू तळघराच्या पाय-या उतरू लागली. तिनं शेवटच्या पायरीवरून पाहिलं की, राधा मनाशीच बोलत, हातवारे करीत एका कोप-यात बसली आहे. तिच्या डोळ्यात एक चमत्कारिक अशी चमक आहे... सुनंदाला तिनं पाहिलं आणि कोप-यातल्या दाराकडे बोट दाखवून ती खुणावू लागली. मध्येच उठून त्या बंद दाराची कडी मोठमोठ्याने ठोकते आहे... आपल्या नजरेनं, कृतीनं ती दार उघडायला सांगते आहे.

सुनंदानं पाहिलं - जुनं, गंजलेलं, भलं मोठं कुलूप राधेच्या कडी आपटण्यामुळे हलत होतं. त्याची हातभर लांब किल्ली कुठे आहे ते सुनंदाला माहीत होतं... तिला क्षणभर वाटलं, पळत पळत वर जावं अन् किल्ली आणून तो दरवाजा उघडावा. गेल्या शंभरेक वर्षांत बंद असलेला तो दरवाजा उघडावा. पाहावं काय आहे तिथे ते.

अगदी लहान असताना राधेनं बाबांजवळ तो दरवाजा उघडण्याचा हट्ट धरला होता. रडायला लागली. ऐकेचना. खरं म्हणजे आपल्या सगळ्यांनाच त्या दरवाजापलीकडच्या विश्वाबद्दल उत्सुकता होती. राधा ऐकेचना. तसे बाबा संतापले. मोठमोठ्यानं ओरडत त्यांनी सा-यांना तळघरातून वर आणलं. तरीही राधा ऐकेना. तेव्हा मात्र समजूत घालावी तसं बाबांनी सांगितलं, “अगं राधा, गावाबाहेर जी बारव आहे ना, तिथपर्यंतचा भुयारी मार्ग आहे तो. आपले पूर्वज त्या बारवेची, बारवेच्या काठावर असलेल्या शिवाची पूजा करायला जात असत या मार्गानं... पण आता तो दरवाजा आपण कायम बंद केला आहे. कायमचा... आता जर उघडला ना तर - तर त्यात भले मोठे साप आहेत वस्तीला, अंधारातही डोळे चमकतात त्यांचे! दरवाजा उघडून काय मरायचंय?”

“पण बाबा, नुसतं एकदा दाखवा ना. पहायचं अन् पटकन् बंद करायचा दरवाजा.” राधेनं अधिकच रडवेल्या स्वरात अन् लाडिकपणे म्हटलं होतं. तिच्यापेक्षा मोठी सरस्वती, तीही हट्ट करू लागली होती... राघव म्हणाला होता, “ताई, तू सांग ना बाबांना. तुझं ऐकतील ते.” पण आपण नुसत्या धाकानंच गप्प बसलो होतो. बाबांनी काही शेवटपर्यंत तो दरवाजा उघडला नव्हता. त्या तळघराप्रमाणेच मनाच्या तळघरातही तो रहस्यपूर्ण भुयारी मार्ग गाडला गेला होता... एक गूढतेचं वलय त्या दरवाज्याभोवती निर्माण झालं होतं... ती सारी गूढता, उत्सुकता, ती रहस्यमयता राधेच्या मनात उफाळून आली की काय आता? ... या अवस्थेत?

खरंच काय असेल या दरवाजामागे? लहान असताना कुणीतरी सांगत असे, की तिथं हाडांचे सापळे आहेत. देशमुखी टिकवायची, वाढवायची म्हणजे लुटालूट केली पाहिजे... अन् त्यासाठी तळघरं, भुयारी मार्ग हवेतच. खरंच तिथं हाडांचे सापळे असतील? मृत्यूचे थैमान असेल तिथे? मृत्यू! मृत्यू! मृत्यू! हा शब्द ती स्वतःशीच पुन्हा पुन्हा उच्चारत राहिली. आणि त्याला ताल म्हणून की काय राधा ती कडी पुन्हा पुन्हा वाजवत राहिली... तालावर, ठेक्यावर.

नागनाथ कोत्तापल्ले, *कुंडली, राजधानी* (२०११)

(अ) वरील उता-यातून सूचित होणा-या आशयासंबंधी काय म्हणता येईल?

(ब) वरील उता-यात उपयोगात आणलेल्या निवेदनतंत्राबाबत काय म्हणता येईल?

**2.**

माझी कोण गती सांगा पंढरि-नाथा |
तारीसी अनाथा केव्हा मज ||१||
मनापासोनीया सांगा मजप्रती |
पुसे काकुळती जीवांचिया ||२||
न बोलसी का रे धरीला अबोला |
कोणासी विठ्ठला शरण जाऊ ||३||
कोणासी साकडे घालावे हे सांग |
नको धरू राग दीनावरी ||४||
बाळकासी जैसी एकचि ते माय |
तैसे तुझे पाय मजलागी ||५||
नामा म्हणे देवा अनाथांच्या नाथा |
कृपाळूवा कांता रखुमाईच्या ||६||

संत नामदेव, *नवनीत*

(अ) या उता-यातून सूचित होणा-या नामदेव व विठ्ठल यांच्या नात्याबाबत काय म्हणता येईल?

(ब) या उता-याच्या शब्दयोजनेविषयी काय म्हणता येईल?